# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./आयसीडी/२०२३-२४/२८
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२३-२४ मधील

## २७ एप्रिल, २०२३ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा मंगळवार दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई- ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु.क्र. | मां. सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १. | प्रा. दिगंबर शिर्के (प्रभारी कुलगुरू) | अध्यक्ष | उपस्थित |
| २. | प्रा. अजय भामरे (प्रभारी प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३. | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | अनुपस्थित |
| ४. | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ५. | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६. | प्रा. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ७. | श्री. संदीप सिंग | सदस्य | उपस्थित |
| ८. | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९. | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १० | प्रा. सुनील भिरूड<br>कुलसचिव (प्र) | सदस्य सचिव | उपस्थित |
| ११ | प्रा. (सीए) प्रदीप कामथेकर<br>वित्त व लेखाअधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| १२ | डॉ. प्रसाद कारंडे<br>(प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ ) | निमंत्रित | उपस्थित |

## अनुपस्थिती :-

डॉ. शेषाद्री चारी यांनी त्यांची अनुपस्थित कळविली असल्याने त्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

**स्वागत** :- सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करून सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

**श्रध्दांजली :-**

**लीलाताई शहा**

ज्येष्ठ लेखिका आणि जयसिंगपूर येथील मराठी जैन साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्षा लीलाताई शहा यांचे वृध्दापकाळाने दिनांक २० मार्च, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८७ वर्षांच्या होत्या.

**स्वामिनी सावरकर**

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या स्नुषा स्वामिनी सावरकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८३वर्षांच्या होत्या.

**उषा गोकाणी**

गांधी स्मारक निधी, मुंबई या संस्थेच्या माजी अध्यक्ष व महात्मा गांधी यांची नात उषा गोकाणी यांचे अल्पशा आजाराने दिनांक २१मार्च, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८९वर्षांच्या होत्या.

**अभय छजलानी**

'द इंडियन न्यूज पेपर सोसायटी' चे माजी अध्यक्ष अभय छजलानी यांचे अल्पशा आजाराने दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८८वर्षांचे होते.

**राहुल बनसोडे**

तरुण लेखक, पर्यावरण आणि पुरोगामी विचारसरणीचे कार्यकर्ते, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिक, नाटय निर्माते असे बहुआयामी व्यक्तिमत्व असलेले राहुल बनसोडे यांचे अल्पशा आजाराने दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ४३वर्षांचे होते.

## प्रदीप सरकार

लेखक–दिग्दर्शक प्रदीप सरकार यांचे अल्पशा आजाराने दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६८वर्षांचे होते.

## मनोज आचार्य

प्रसिध्द लेखक आणि चित्रकार मनोज आचार्य यांचे अल्पशा आजाराने दिनांक २६ मार्च, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६१वर्षांचे होते.

## गिरीश बापट

पुण्याचे माजी पालकमंत्री आणि विद्यमान भाजप खासदार गिरीश बापट यांचे प्रदीर्घ आजाराने दिनांक २९ मार्च, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७२वर्षांचे होते.

## विवान सुंदरम

चित्र–शिल्पांच्या पलीकडल्या दृश्यकलेत मांडण शिल्पे, व्हीडिओ कला आदी अनेक प्रयोग करणारे आणि सामाजिक भान जपणारे दृश्यकलावंत विवान सुंदरम यांचे अल्पशा आजाराने दिनांक २९ मार्च, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयीते ८० वर्षांचे होते.

## शरद काळे

निवृत्त सनदी अधिकारी आणि मुंबई पालिकेचे माजी आयुक्त शरद काळे यांचे प्रदीर्घ आजाराने दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते.

## सलीम दुराणी

क्रिकेटपटू सलीम दुराणी यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०२ एप्रिल, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८८ वर्षांचे होते.

## अरविंद पंचाक्षरी

ज्योतिषाचार्य अरविंद पंचाक्षरी यांचे वृध्दापकाळाने दिनांक ०४ एप्रिल, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८४ वर्षांचे होते.

## अजित भगत

प्रयोगशील नाटयलेखक–दिग्दर्शक अजित भगत यांचे हृदयविकाराने दिनांक २९ मार्च, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६९ वर्षांचे होते.

## डॉ. पौर्णिमा आडवाणी

राष्ट्रीय महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष, लेखिका आणि प्रख्यात वकील डॉ. पौर्णिमा आडवाणी यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०१ एप्रिल, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६३ वर्षांच्या होत्या.

## डॉ. मा. प. मंगुडकर

ज्येष्ठ लेखक–विचारवंत आणि विधान परिषदेचे माजी आमदार डॉ. माणिक पद्मण्णा उर्फ मा. प. मंगुडकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक ०९ एप्रिल, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९४ वर्षांचे होते.

## उत्तरा बावकर

प्रसिध्द अभिनेत्री उत्तरा बावकर यांचे दीर्घकालीन आजाराने दिनांक १२ एप्रिल, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७९ वर्षांच्या होत्या.

## कॅप्टन भाऊराव खडताळे

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्राचे संस्थापक विश्वस्त आणि बौध्द समाजातील पहिले वैमानिक अशी ओळख असलेल्या कॅप्टन भाऊराव खडताळे यांचे वृध्दापकाळाने दिनांक १५ एप्रिल, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९०वर्षांचे होते.

## दीपक भट्टाचार्य

संस्कृत विषयातील तज्ज्ञ आणि वेदशास्त्राचे गाढे अभ्यासक दीपकभट्टाचार्ययांचेवृध्दापकाळाने दिनांक २१ एप्रिल, २०२३ रोजीनिधनझाले. मृत्यूसमयीते ८२ वर्षांचे होते.

## तारेकफतह

पाकिस्तानी वंशाचे कॅनडाचे पत्रकार तारेक फतह यांचे दीर्घ आजाराने दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७३ वर्षांचे होते.

## प्रकाशसिंग बादल

शिरोमणी अकाली दलाचे नेते आणि पजाबचे माजी मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल यांचे श्वसनासंबंधी त्रासामुळे दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९५ वर्षांचेहोते.

| बाब.क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| १ | दि. २१ मार्च, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्ता व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | का.प्रा.वि . |
| ठराव | दि. २१ मार्च, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्तबाब क्र.४ मध्ये दुरूस्ती सुचविण्यात आली खालीलप्रमाणे :-<br>"सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली व असा ठराव करण्यात आला की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून नवीन अभ्यासक्रम/विद्याशाखा/विषय/अतिरिक्त तुकडी/ आणि सॅटेलाईट केंद सुरु करण्याकरिता प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१७/२०८/१७/मशि-४ दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ अन्वये 'अ' नुसार कार्यवाही करून छाननी समिती, तज्ज्ञ समितीच्या शिफारशी, अधिष्ठाता मंडळाचा निर्णय व कुलगुरूंचे अंतिम निर्णय विचारात घेऊन नवीन अभ्यासक्रम/bxbxविद्याशाखा/ विषय/अतिरिक्त तुकडीसाठी एकूण प्राप्त १५० प्रस्तावांपैकी ५३ प्रस्ताव पात्र, तसेच सॅटेलाईट केंद सुरु करण्याकरिता एकूण प्राप्त २ प्रस्तावांपैकी १ प्रस्ताव पात्र झाले. पात्र झालेले प्रस्ताव शासनाकडे शिफारस करण्याची मंजुरी देण्यात आली (संलग्न परिशिष्ट 'अ')".<br>**ऐवजी असे वाचावे**<br>"उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि–४ दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ नुसार विस्तारीकरणार्तगत शैक्षणिक वर्ष २०२३–२४ साठी एकुण १५० प्रस्ताव प्राप्त झाले. तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय एनजीसी २०२०/(११५/२०)/मशि–४ दिनांक १८ सप्टेंबर, २०२० नुसार नवीन सॅटेलाईट केंद्र सुरू करण्यासाठी २ प्रस्ताव प्राप्त झाले.<br>सदर प्रस्तावाबाबत खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला खालील अटींची पूर्तता करणारे प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावे<br>१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि–४ दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ नुसार सर्व अटींची पूर्तता करणारे महाविद्यालयांचे प्रस्ताव पाठविण्यात यावे.<br>२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि–४ दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ नुसार ज्या महाविद्यालयांची स्थापना होऊन ५ वर्ष पूर्ण व्हायचे आहेत, अशा महाविद्यालयांना नॅक लागू नाही परंतु विद्यापीठ मान्यता प्राप्त प्राचार्य व शिक्षक आहेत अश्या सर्व महाविद्यालयांचे प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावे. | |

| | | |
|---|---|---|
| | ३) ज्या महाविद्यालयांची नॅक बाबत SSR Submit कलेले आहे तसेच विद्यापीठ मान्यता प्राप्त प्राचार्य व शिक्षक आहेत अश्या सर्व महाविद्यालयांचे प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावे.<br><br>४) ज्या महाविद्यालयांचे नॅक झालेले आहे, विद्यापीठ मान्यता प्राप्त शिक्षक आहेत परंतु विद्यापीठ मान्यताप्राप्त पूर्ण वेळ प्राचार्यांना कालावधी दिनांक ३० जून, २०२२ नंतर संपलेला आहे अश्या सर्व महाविद्यालयांचे प्रस्ताव पाठविण्यात यावे.<br><br>५) जे महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुरू झालेले आहेत अशा महाविद्यालयांना नॅक लागू नाही आणि मान्यता प्राप्त प्राचार्य व शिक्षक भरती करीता जाहिरातीची प्रक्रिया सुरू आहे अशा सर्व महाविद्यालयांचे प्रस्ताव पाठविण्यात यावे.<br><br>उपरोक्त दिलेल्या ०५ अटीशर्तीची पूर्तता न करणाऱ्या सर्व महाविद्यालयांचे विस्तारीकरणाचे प्रस्ताव शासनास पाठवू नये असा ठराव करण्यात आला.<br><br>६) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय एनजीसी २०२०/(११५/२०)/मशि-४ दिनांक १८ सप्टेंबर, २०२० नुसार नवीन सॅटेलाईट केंद्र सुरू करण्यासाठी प्राप्त दोन प्रस्तावांपैकी शैलेंद्र एज्युकेशन सोसायटीचे, आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज यांचा प्रस्ताव दोन नवीन अभ्यासक्रमासह (बी. एस्सी -डेटा सायन्स आणि बी.एस्सी-हॉस्पीटॅलिटीज स्टडीज) शासनासस पाठविण्यात यावे. | |
| २ | मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात 'आदिवासी मुला-मुलींसाठी वसतीगृह' बांधणे आणिआदिवासी संशोधन अध्यासन केंद्रासाठी जागा उपलब्ध करून नवीन बांधकाम करणे या बाबीस मंजुरी देण्याबाबत | पा.सु.नि.अं व दे विभाग |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, ठाणे व कल्याण उपपरीसरचा विकास करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर चालू आहे. ही बाब, पायाभूत सुविधा नियोजन, अंमलबजावणी आणि देखभाल विभागाने, अखिल भारतीय आदिवासी कर्मचारी महासंघाच्या निर्देशनास आणून द्यावी. तसेच ठाणे, कल्याण सब सेंटर च्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह' बांधण्यासंदर्भात पूर्ण व्यवस्थापन परिषद अस्तिवात आल्या नंतर त्यांच्या पुढे ही बाब सादर करण्यात यावी, असे ठरले. | |
| ३. | विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रसिद्ध केलेल्या Adjunct Faculty च्या पॅनेलमेंटसाठी मार्गदर्शक तत्वे विद्यापीठामध्ये लागू करण्याबाबत- | शैक्षणिक नेमणूक गुणवत्ता आणि हमी विभाग |
| ठराव | विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रसिद्ध केलेल्या Adjunct Faculty च्या पॅनेलमेंटसाठी मार्गदर्शक तत्वे विद्यापीठामध्ये लागू करण्याबाबत बाब मान्य करण्यात आली. तसेच विभागाने कार्याभाराचा अवश्यकता असल्यास आढावा घेण्यात यावा असे ठरले. | |

| | | |
|---|---|---|
| ४ | विद्यानगरी परिसरातील आयुर्वेदिक उद्यानाची देखभाल करणे व त्याअनुषंगाने आवश्यक सुविधांची पूर्तता करून घेण्यास मान्यता मिळणेबाबत | महाविद्यालय मान्यता आणि विकास विभाग |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, विद्यानगरी परिसरातील आयुर्वेदिक उद्यानाची देखभाल करणे व त्याअनुषंगाने आवश्यक सुविधांची पूर्तता करून घेण्यास जीवन विज्ञान (Department of life science) या विभागामध्ये वर्ग करण्यात यावा. तसेच जीवन विज्ञान (Department of life science) या विभागाने देखरेखीबाबतचा प्रस्ताव तयार करून व्यवस्थापन परिषदे पुढे सादर करावा आणि मित्तल महाविद्यालयालाकळविण्यात यावे की, मुंबई विद्यापीठ व मित्तल महाविद्यालयाचा करार संपुष्टात आलेला आहे व सदर उद्यानाची देखरेख विद्यापीठ करणार आहे. | |
| ५ | Request of the Vice Principal Shri Domibivli Mitra Mandal, Matushri kashiben Motilal Patel, Senior College of Commerce, Padmakar Colony, Nr. Thakurli Railway Station, Thakurli (E), Dist. Thane-421 201 vide letter No.OR/04686/KMP-2021-22 dated 21st December, 2021 to change the name of the college from "D.K.V.C. and K.M. Patel College of Commerce and Science, Thakurli (E)" to Shri Dombivli Mitra Mandal's Matushri Kashiben Motilal Patel Senior College of Commerce and Science". | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | असा ठराव पारित करण्यात आला की, श्री डोंबिवली मित्र मंडळ, मातुश्री काशीबेन मोतीलाल पटेल, सिनियर कॉलेज ऑफ कॉमर्स, पद्माकर कॉलनी, ठाकुर्ली रेल्वे स्टेशन जवळ, ठाकुर्ली (पू), जि. ठाणे-४२१ २०१, या महाविद्यालयाचे पत्र क्र.OR/04686/KMP-2021-22, दिनांक २१ डिसेंबर, २०२१ रोजीच्या पत्रानुसार महाविद्यालयाचे नाव श्री डोंबिवली मित्र मंडळ, मातुश्री काशीबेन मोतीलाल पटेल, सिनियर कॉलेज ऑफ कॉमर्स च्या ऐवजी "श्री. डोंबिवली मित्र मंडळ, मातुश्री काशीबेन मोतीलाल पटेल, सिनियर कॉलेज ऑफ कॉमर्स आणि सायन्स" असा महाविद्यालयाच्या नावात बदल करण्यासाठी रू.२५०००/- (रूपये पंचवीस हजार फक्त) शुल्क घेण्यात यावे. | |

| | | |
|---|---|---|
| ६ | To allow credit transfers up to 40% the total courses being offered in a particular programme in a semester offered through (Swayam) platform as per UGC Gazette Notification dated 25th March, 2021 (Credit Framework for Online Learning Courses through Study Webs of Active Learning for Young Aspiring Minds) Regulations, 2021 as adopted AICTE on similar pattern. | विद्याविषयक प्राधिकरणे बैठक आणि सेवा विभाग |
| ठराव | It is resolved that to allow credit transfers up to 40% the total courses being offered in a particular programme in a semester offered through (Swayam) platform as per UGC Gazette Notification dated 25th March, 2021 (Credit Framework for Online Learning Courses through Study Webs of Active Learning for Young Aspiring Minds) Regulations, 2021 as adopted AICTE on similar pattern be accepted. | |
| ७ | मा. उच्च न्यायालयात श्री. अशोक वाघमारे सेवानिवृत्त अधीक्षक यांच्या विरोधातील ४ पैकी १ प्रकरण न्यायप्रविष्ट असून सदर प्रकरणी न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधीन राहून श्री. अशोक वाघमारे सेवानिवृत अधिक्षक (निलंबित) यांना तदर्थ निवृत्तीवेतन (Ad-hocPension) सुरु करण्याबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, मा. उच्च न्यायालयात श्री. अशोक वाघमारे सेवानिवृत्त अधीक्षक प्रकरणी न्यायालयाचा अंतिम आदेशाच्या अधीन राहून श्री. अशोक वाघमारे सेवानिवृत्ती अधिक्षक (निलंबित) यांच्या निवृत्तीवेतनाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. | |
| ८ | विश्वविद्यालय अनुदान आयोग (UGC) च्या एप्रिल, २०२२ मार्गदर्शिकेनुसार २ डिग्री पूर्णवेळ अभ्यासक्रम एकत्र शिकण्याबाबत. | विद्याविषयक प्राधिकरणे बैठक आणि सेवा |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, विश्वविद्यालय अनुदान आयोग (UGC) च्या एप्रिल, २०२२ मार्गदर्शिकेनुसार २ डिग्री पूर्णवेळ अभ्यासक्रम एकत्र शिकण्याबाबत मान्यता देण्यात आली. | |
| ९ | Requisition for financial assistance for the amount Rs.12,50,000/- (Rupees Twelve Lakh Fifty Thousand) in relation to the University of Mumbai Law Academy team representing India at the World Rounds of the IBA ICC Moot Court Competition. | UMLA |

| | | |
|---|---|---|
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, IBA ICC Moot Court स्पर्धेच्या जागतिक फेरीत भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मुंबई विद्यापीठाच्या विधी अकादमी संघाच्या संबंधात प्रवास आणि व्हिसाच्या आर्थिक सहाय्याची मागणी मंजूर करण्यात आली. तसेच विद्यार्थी विकास विभागाने धोरणात्मक बाब प्रशासना पुढे ठेवावी आणि असे कोणकोणत्या स्पर्धेचे समर्थन विद्यापीठ करू शकतो याबाबत अधिक माहिती सादर करावी. | |
| १० | मुंबई विद्यापीठावरील प्रशासकीय खर्च आटोक्यात ठेवून शिक्षणाच्या मुलभूत विकासासाठी व विद्यापीठाच्या पायाभूत सुविधांसाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विद्यापीठातील प्रशासकीय कामे बाह्य यंत्रणे कडून करून घेण्यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या शासनाने नियुक्त केलेल्या सेवा पुरवठादार संस्था/एजन्सी यांच्या पॅनेल मार्फत करण्यासाठी मान्यता देणेबाबत. | मानव संसाधन विकार कक्ष |
| ठराव | मुंबई विद्यापीठावरील प्रशासकीय खर्च आटोक्यात ठेवून शिक्षणाच्या मुलभूत विकासासाठी व विद्यापीठाच्या पायाभूत सुविधांसाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विद्यापीठातील प्रशासकीय कामे बाह्य यंत्रणे कडून करून घेण्यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा नियुक्त्या शासनाने नियुक्त केलेल्या सेवापुरवठादार संस्था/एजन्सी यांच्या पॅनेल मार्फत करण्यासाठी मान्यता देण्यात आली. | |
| ११ | विद्या परिषदेच्या दिनांक ०६ एप्रिल, २०२३ रोजीच्या सभेमध्ये खालील बाबींवर केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ प्रस्ताव सादर. | विद्याविषयक प्राधिकरणे सभा आणि सेवा |
| ठराव | विद्या परिषदेच्या दिनांक ०६ एप्रिल, २०२३ रोजीच्या सभेमध्ये खालील बाबींवर केलेल्या शिफारशिंस मान्यता देण्यात आली<br>1)**5.2 (N)**- to introduce B.Voc. (Media, Entertainment and Acting) - Sem I and II (CBCS)<br>2)**5.3(N)** -the regulation as per appendix be passed for the Scheme of Examination for T.Y.B.Voc. (Media Production) – Sem V and Sem VI<br>3) **5.5(N)** -to introduce Ph.D. in Comparative Literature along with the Ordinance for Ph.D. Course Work in Comparative Literature<br>4) **5.6(N)** -to introduce Ph.D. in Applied Language Studies in English along with the Ordinance for Ph.D. Course Work in Applied Language Studies in English<br>5) **5.7(N)** -to introduce Postgraduate Diploma in Book History Studies– Sem I and II (CBCS) | |

**6)5.8(N)** -to introduce Postgraduate Diploma in Trauma and Literary Studies– Sem I and II (CBCS)

**7) 5.9 (N)** -to introduce Postgraduate Diploma in Intellectual Property Rights (Copyrights/ Trademark / Patents)– Sem I and II (CBCS)

**8) 5.10(N)** - to introduce Certificate Course in Copyrights and Plagiarism – Sem I and II (CBCS)

**9) 6.4** - दहावीनंतर तांत्रिक पदविका अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी धोरण निश्चित करणेबाबत

**10) 6.5**- तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाने B.Des. (Design) या अभ्यासक्रमाचा Syllabus विद्यापीठाकडून मान्य करुन घेतलेला नसताना विद्यार्थ्यांना प्रवेशित करुन वर्ग सुरु केल्याने तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाने सादर केलेला खुलासा

**11) 6.6**- शिवाजीराव एस. जोंधळे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाने B.E.(Automation and Robotics) या अभ्यासक्रमाच्या Syllabus ला विद्यापीठाची मान्यता घेतलेली नसताना विद्यार्थ्यांना प्रवेशित करुन वर्ग सुरु केल्याने शिवाजीराव एस. जोंधळे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाने सादर केलेला खुलासा

**12) 7.1(N)** - to introduce B.Voc. (Management & Entrepreneurship Development) (CBCS) (Sem.- I to VI)

**13) 7.2(N)** - to introduce M.Voc. (Management & Entrepreneurship Development)(CBCS) (Sem.- I to VI),

**14) 7.3(N)** - to introduce B.Voc. (Wealth Management) (CBCS) (Sem.- I to VI)

**15) 7.4(N)** - to introduce B.Voc. (E Commerce and Digital Marketing) (CBCS) (Sem.-I to VI),

**16) 7.5 (N)** - to introduce B.Voc. (Accounting and Taxation) (CBCS) (Sem.- I to VI),

**17) 7.12(A)** relating to the amended O.6506 for Title of B.Voc. (Tourism and Hospitality) (Sem. I to VI)

**18) 7.16**- regarding relating to the regulation, Performance Grading, Standard of Passing & Intake Capacity for **B.Voc.(Hospitality and Tourism) (CBCS) (Sem.- I to VI)**

**19) 7.17**- regarding relating to the regulation, Performance Grading, Standard of Passing & Intake Capacity for **B.Voc.(Health Care) (CBCS) (Sem.- I to VI)**

| | | |
|---|---|---|
| | 20) **8.1(N)** - to introduce B.A. B.Ed. four years integrated course – Sem I to VIII (CBCS)<br><br>21)**8.2(N)** - to introduce the M.Sc. (Environmental Science) (By Research) - Sem I and II(CBCS)<br><br>22)**8.3(N)** - to introduce PG Diploma in Rehabilitation Psychology<br><br>23)**8.4(N)** - to introduce LLM (Commercial Law)(CBCS)<br><br>24)**8.6(A)** - for amendment of O.6671 relating to title of the course M.Sc. (Maritime Studies)<br><br>25)**8.14(A)** - for amendment of O.4006 relating to eligibility criteria for B.P.A. (Music)<br><br>26)**8.15(A)** - for amendment of R. 4269 and R.4270 relating to standard of passing for M.P.A. (Music)<br><br>27)**8.16(A)** - for amendment of R. 4264 relating to standard of passing for B.P.A. (Music)<br><br>28)**8.18(A)** - that the regulation for the Scheme of Examination forCertificate Course in Life Skill Education<br><br>29)**8.19(N)** - to introduceB.Voc. (Media, Communication and Journalism) (CBCS) (Sem - I to VI)<br><br>30)**8.20** - To change the title of BLS i.e for LLB. Five years Integrated Course to BA.LLB, new ordinance number be given to the amended title as when earlier in the year 1988 when the course was introduced and in the year 1998 when thenomenclature of course was changed ordinance number was not assigned for the same | |
| १२ | Requesting permission to donate projectors to 50 school in the name of Department of Physics, University of Mumbai under golden jubilee Grant sanctioned during 2021-2022 | भौतिकशास्त्र विभाग |
| ठराव | It is resolved that request of Department of Physics, University of Mumbai for the permission to donate projectors to 50 school in the name of Department of Physics, University of Mumbai under golden jubilee Grant sanctioned during 2021-2022 is not accepted. | |

| | | |
|---|---|---|
| १३ | To grant sanction for international Travel Grant from General Fund Budget Head, University of Mumbai to Prof. Vaishali Bambole, Department of Physics. | भौतिकशास्त्र विभाग |
| ठराव | प्रा. वैशाली बांबोले यांच्या आंतरराष्ट्रीय प्रवासाच्या देयकाबद्दल असे ठरले की, मुंबई विद्यापीठाच्या सामान्य प्रशासन विभागाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनासाइन्ड ग्रान्ट (Unassigned Grant) बद्दल अभिप्राय द्यावा. सदर अभिप्राय पुढील व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यात यावा. | |
| १४ | राहुल शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या पुढील शैक्षणिक वर्षाच्या २०१७-२०१८, २०१८-२०१९ व २०१९-२०२० वरील दर्शीविलेल्या शैक्षणिक वर्षाच्या सेमी-२ व सेम-३ मध्ये सदर महाविद्यालयाने विद्यार्थांना एकच Pedagogy (Methods) सदर दिल्यामुळे त्याची पदवी प्रमाणपत्र विभागाने राखुन ठेवलेली आहेत असे समजते पदवी प्रमाणपत्रे न मिळाल्याबाबत . | परीक्षा व मूल्यमापन मंडळ |
| ठराव | अधिष्ठाता मंडळाच्या दिनांक २६ जुलै, २०२२ रोजीच्या बैठकीतील बाब क्र. ९.४ अन्वये पारित झालेल्या ठरावानुसार राहुल शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या पुढील शैक्षणिक वर्षाच्या २०१७-२०१८, २०१८-२०१९ व २०१९-२०२० वरील दर्शीविलेल्या शैक्षणिक वर्षाच्या सेमी-२ व सेम-३ मध्ये सदर महाविद्यालयच्या विद्यार्थांना एकच Pedagogy (Methods) दिल्यामुळे त्याची पदवी प्रमाणपत्र विभागाने राखुन ठेवल्यामुळे सदर विद्यार्थांना पदवी प्रमाणपत्र देण्यात आलेली नाहीत. याबाबत महाविद्यालयाच्या व्यवस्थापनास प्रती विद्यार्थी दंड आकारण्यात यावा. दंडाची रक्कम प्रती विद्यार्थी ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) अशी आकारण्यात यावी व सदर दंडाची रक्कम महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने भरावी. सदर रक्कम विद्यार्थांकडून वसूल करण्यात येऊ नये अशी स्पष्ट ताकीद महाविद्यालयास देण्यात यावी. तसेच महाविद्यालयाकडे दंड भरल्यानंतर पदवी प्रमाणपत्र विभागाने पदवी प्रमाणपत्र वितरीत करावी अशी अधिष्ठाता मंडळाची शिफारीस मान्य करण्यात आली. | |
| १५ | Hiring non-teaching Technical posts in Department of information and Communication technology (UCC & CCF) | DICT |
| ठराव | It is resolved that the hiring non-teaching Technical posts in Department of information and Communication technology (UCC & CCF) by NICSI be accepted. | |

| | | |
|---|---|---|
| १६ | मुंबई विद्यापीठातील वसतीगृहातील समस्या सोडविण्याकरिता सल्लागार समिती गठीत करून देणेबाबत | विद्यानगरी प्रशासकिय विभाग |
| ठराव | सदर प्रस्ताव मागे घेण्यात आला. | |
| १७ | Approval of Minutes of Building and Works Committee dated 24th April 2023 and to place item before Management Council. | IPEMD |
| ठराव | The minutes of Building and Works Committee dated 24th April 2023 were accepted. | |
| १८ | विद्यानगरी परिसरातील शिक्षक कर्मचारी वसाहतीतील सदनिका विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांना उपलब्ध करून देणेबाबत. | विद्यानगरी प्रशासकिय विभाग |
| ठराव | विद्यानगरी परिसरातील शिक्षक कर्मचारी वसाहतीतील सदनिका विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांना उपलब्ध करून देणेबाबत समितीचा अहवाल मान्य करण्यात आला. | |
| १९ | दिनांक २२ एप्रिल, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधीकरणे विभाग |
| ठराव | दि. २२ एप्रिल, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. | |
| २० | A proposal placed before the Management Council regarding to approve and enhance the honorarium of the University Consulting Physicians (02) from Rs.250/- to Rs.500/- for each file. | Department of Students Welfare |
| ठराव | It is resolved that to approve and enhance the honorarium of the University Consulting Physicians (02) from Rs.250/- to Rs.400/- for each file, be accepted. | |
| २१ | सोबत प्रभारी प्राचार्य, ज्ञान गंगा एज्युकेशन ट्रस्टचे कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स, बी.एस.एस. अँड बी.एससी. (आय. टी .) हायपर सिटी मॉल समोर, कासारवडवली, जि. बी. रोड, ठाणे (प)-४००६१५ या महाविद्यालयाचे पत्र क्र. Dgets/09/5700/ 2022-23, दिनांक 25 मार्च, २०२३ रोजी ज्ञान गंगा एज्युकेशन ट्रस्टचे कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स, बी.एस.एस. अँड बी.एससी. (आय. टी.) ऐवजी ज्ञान गंगा एज्युकेशन ट्रस्टचे डिग्री कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स असा महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याबाबतच्या प्रस्ताव. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |

| | | |
|---|---|---|
| ठराव | असा ठराव पारित करण्यात आला की, ज्ञान गंगा एज्युकेशन ट्रस्टचे कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स, बी.एस.एस. अँड बी.एसी. (आय. टी .) हायपर सिटी मॉल समोर, कासारवडवली, जि. बी. रोड, ठाणे (प)-४००६१५ या महाविद्यालयाचे पत्र क्र. Dgets/09/5700/ 2022-23, दिनांक 25 मार्च, २०२३ रोजीच्या पत्रानुसार ज्ञान गंगा एज्युकेशन ट्रस्टचे कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स, बी.एस.एस. अँड बी.एसी. (आय. टी.) च्या ऐवजी ज्ञान गंगा एज्युकेशन ट्रस्टचे डिग्री कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स असा महाविद्यालयाच्या नावात बदल करण्यासाठी रू.२५०००/- शुल्क घेण्यात यावे. | |
| २२ | रिझवी कला, वाणिज्य आणि महाविद्यालयाला ३०० विद्यार्थीची प्रवेश क्षमता असल्यामुळे आदर महाविद्यालयास एप्रिल २०१८ आणि मे २०१९ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्याविषयाची बाबत मा. व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २४ जुलै, २०२० रोजीच्या बाब क्र.४ अन्वये पारित करण्यात आलेल्या ठरावानुसार सत्यशोधन समितीने सादर केलेला अहवाल. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | असे ठराव करण्यात आला की, पोलीस चौकी मध्ये तक्रार दाखल करण्यात यावी. तसेच तत्कालीन संबधित अधिकारी व करणाऱ्यांची चौकशी करण्यात यावी. हे कृत्य बेकायदेशीर आहे, त्यामुळे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१ (यत्र) अन्वये १०/- (दहा लाखाचा) दंड आकारण्यात यावा, रिझवी कॉलेज ऑफ हॉटेल अँड मॅनेजमेंट अभ्यासक्रम पुढील एक वर्षासाठी प्रवेश बंद करण्यात यावा. तसेच याबाबत कायदेशीर सल्ला घेण्यात यावा. | |
| २३ | कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या पत्र क्र. बदल -२०२३/(७२/२३)/मशि-४, दिनांक २४ मार्च, २०२३ रोजीच्या पत्रानुसार एस.ई.एस. दयाळ आशा नाईट लॉ कॉलेज या महाविद्यालयाच्या नावाने बदल करून आवश्यक त्या खुलाशासह सदर प्रस्ताव तत्काळ सादर करण्याबाबत. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | असा ठराव पारित करण्यात आला की, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या पत्र क्र. बदल -२०२३/(७२/२३)/मशि-४, दिनांक २४ मार्च, २०२३ रोजीच्या पत्रानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६/महाराष्ट्र शासनाच्या वेळोवेळी निर्गमित शासन परिपत्रकांच्या अधिन राहून एस.ई.एस. दयाळ आशा नाईट लॉ कॉलेज या महाविद्यालयाच्या नावामधील नाईट शब्द वगळण्याबाबत प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, असे ठरले. | |



14

| | | |
|---|---|---|
| २४ | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून प्रस्तावित नवीन महाविद्यालये सुरु करण्याकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे क्र.मान्यता-२०२३/प्र.क्र.६३/मशि-४, दिनांक ०१ एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एकूण २२ संस्थांना इरादापत्र प्राप्त झाले. सदर प्रस्तावांवरील तज्ञ समितीचा अहवाल अधिष्ठाता मंडळाचा ठराव आणि मा. कुलगुरू महोदयांचे निर्णय विषयी बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने शासनास सादर करणेबाबत. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे क्र. मान्यता –२०२३/प्र.क.६३/मशि–४, दिनांक ०१ एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून नविन महाविद्यालय सुरू करण्यासाठी एकूण २२ संस्थांना इरादापत्र प्राप्त झाले. सदर प्रस्तावित नविन महाविद्यालयाच्या दस्तऐवजांची छाननी व पुर्न: छाननी समितीद्वारे करण्यात आली. छाननी समितीचा प्राप्त अहवाल अधिष्ठाता मंडळापुढे दिनांक १७ एप्रिल, २०२३ रोजी मान्यतेकरिता सादर करण्यात आला होता. प्राप्त झालेल्या एकूण २२ प्रस्तावांना अधिष्ठाता मंडळाने तपासून एकूण २२ प्रस्तावांपैकी २० प्रस्ताव पात्र व उर्वरीत ०२ अपात्र प्रस्ताव मा. कुलगुरु महोदयांच्या सुनावणीसाठी शिफारस करण्यात आले असता, ०२ प्रस्तावांपैकी ०१ संस्थेचा प्रस्ताव पात्र व ०१ संस्थेचा प्रस्ताव अपात्र ठरविण्यात आला.<br><br>सदर एकूण २२ प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात आले असता ०१ प्रस्ताव 'अपात्र' व २१ प्रस्तावित महाविद्यालयांचे 'पात्र' प्रस्ताव (परिशिष्ट 'ब') सकारात्मक शिफारशीसह शासनाकडे सादर करण्यास समितीकडून शिफारस करण्यात येत आहे. | |

कुलसचिवानी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

कुलसचिव (प्र)

प्र- कुलगुरू

मां. कुलगुरू